२८.०७.२०२०

स्मरणपत्र - क्र.४

प्रती,

**मा. कुलगुरू महोदय,**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,

नागपूर

**विषय : महाविद्यालयात घेण्यात येणाऱ्या शारीरिक क्षमता चाचणी व वैद्यकीय तपासणीचे सुधारित मानधन परिपत्रक काढण्याबाबत.**

महोदय,

विद्यापीठ अध्यादेश क्र. **Acad.No.N/38 dated 3rd may 2008** नुसार सर्व महाविद्यालयांमध्ये शारीरिक क्षमता चाचणी व वैद्यकीय तपासणी करिता प्रती विद्यार्थी रु.१०/- मध्ये वाढ करून रु.२०/- करण्यात आले. यानंतर पुन्हा या शुल्कात विद्यापीठ अध्यादेश क्र. **Acad.No.N/352 dated 31 may 2013** नुसार वाढ करून रु.४०/- करण्यात आलेत.

परंतु विद्यार्थ्यांकडून महाविद्यालयात जमा होणाऱ्या शुल्कातून खर्च कसा करायचा किंवा शारीरिक क्षमता चाचणीसाठी नियुक्त बाह्य व अंतर्गत परीक्षक तसेच वैद्यकीय तपासणीसाठी नियुक्त डॉक्टर यांच्या मानधनात किती वाढ करायची याबाबत १२ वर्षात संबंधित विभागाने एकही परिपत्रक निर्गमित केलेले नाही. याबाबत वेळोवेळी मा.संचालक, शारीरिक शिक्षण व क्रीडा आणि वेळ प्रसंगी मा.कुलगुरू महोदय (आपणास) यांना अनेक निवेदन देण्यात आलीत.

मा. संचालक म्हणतात हे आमच्या विभागाचे काम नाही, वित्त विभाग म्हणते हे शारीरिक शिक्षण विभागाचे काम आहे, महाविद्यालयात जुन्हा दराप्रमाणे डॉक्टर येण्यास तयार नाहीत. कारण आजही जुन्या परिपत्रकाप्रमाणे रु.१०/- मधून रु.२/- प्रती विद्यार्थी किंवा कमीत कमी रु. २००/- + रु.३०/- वाहन भत्ता देण्याचे प्रावधान आहे.

एकूणच सर्व परिस्थिती लक्षात घेता आणि महाविद्यालयात रु.१०/- ऐवजी जेंव्हा रु.४०/- घेण्यात येत आहेत तर रु. ४०/- मधून सुधारित मानधन देण्याचे परिपत्रक निर्गमित करणे मा.संचालक, शारीरिक शिक्षण विभाग आणि विद्यापीठ वैद्यकीय विभाग यांची जबादारी निश्चित करणे गरजेचे झाले आहे. यामध्ये शुल्क वाढीच्या प्रमाणात मानधन वाढविण्यात यावे, यामुळे विद्यापीठ प्रशासन किंवा महाविद्यालय प्रशासन यांच्यावर कोणताही अधिभार पढणार नाही.

महोदय आपणास विनंती पूर्वक निवेदन आहे आता आकारण्यात येत असलेल्या शुल्काच्या आधारे सुधारित मानधन पत्रक तातडीने काढून सत्र २०१४-१५ पासून रु.४०/- शुल्क घेत असल्यामुळे त्याच सत्रापासून लागू करण्याचे निर्देश द्यावेत.

शारीरिक क्षमता चाचणी व वैद्यकीय तपासणी चे सुधारित मानधन पत्रक प्रस्ताव सोबत जोडले आहे.

धन्यवाद !

आपले स्नेही

महासचिव / सचिव

नागपूर युनिव्हर्सिटी फिजिकल एज्यकेशन

टीचर्स असोसिएशन, नागपूर

**संलग्न : १. शारीरिक क्षमता चाचणीचे मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव**

**२. वैद्यकीय तपासणी मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव**

**३. विद्यापीठ अध्यादेश क्र. Acad.No.N/352 dated 31 may 2013**

**४. शारीरिक शिक्षण विभागाचे रु.१० च्या विभाजनाबाबत परिपत्रक क्र.३४६/1 दि.२४.०६.२००९**

**शारीरिक क्षमता चाचणीचे मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव-**

शारीरिक शिक्षण मंडळाची सभा दि. ३१/७/२०१२ रोजी शिफारस केलेल्या मानधनात खालील प्रमाणे वाढ करण्यात यावी. कारण दि.३१/७/२०१२ चा प्रस्ताव शारीरिक क्षमता चाचणी शुल्क रु.२०/- वर आधारित होता, परंतु दि. ३१/५/२०१३ च्या विद्यापीठ परिपत्रक क्र.Acad/३५२ प्रमाणे आता महाविद्यालयात विद्यार्थ्यांकडून रु. २०/ एवैजी रु. ४०/- आकारण्यात येतात. त्यामुळे सुधारित परिपत्रक खालील प्रमाणे काढण्यात यावे.

| | | |
|---|---|---|
| १ | बाह्य परीक्षक - एक | प्रती विद्यार्थी रु १०/- प्रमाणे, मात्र किमान रु. १०००/ अधिक प्रती सत्र रु १००/- प्रमाणे वाहन भत्ता अनुज्ञेय राहील |
| २ | आंतर्गत परीक्षक - एक | प्रती विद्यार्थी रु १०/- प्रमाणे, मात्र किमान रु. १०००/ |
| ३ | सहाय्यक - दोन<br>(शारीरिक शिक्षण शिक्षक) | सहाय्यक प्रती सत्र प्रती व्यक्ती रुपये ५००/- प्रमाणे |
| ४ | परीक्षेचे संचलन करण्यासाठी | महाविद्यालयाने प्रती दिवस रु.५००/ याप्रमाणे अनुषंगिक खर्च (चुना पावडर, शिवाय कारकून / मार्कर दैनिक भत्ता रु २००/- प्रती दिवस) |

वरील मानधनावर होणारा खर्च महाविद्यालातर्फे विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणाऱ्या शारीरिक क्षमता चाचणी शुल्कातून करण्यात येईल व विद्यापीठावर याचा कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही.

आपला स्नेही

सचिव, नुपेटा

**<u>वैद्यकीय तपासणी मानधनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव</u>-**

पूर्वी वैद्यकीय तपासणी शुल्क रु.१०/- व नंतर रु.२०/- आकारण्यात येत होते, परंतु दि.३१/५/२०१३ च्या विद्यापीठ परिपत्रक क्र.Acad/३५२ प्रमाणे आता संलग्नित सर्व महाविद्यालयात प्रत्येक विद्यार्थ्यांकडून रु.२०/ एवैजी रु. ४०/- आकारण्यात येतात. त्यामुळे सुधारित वैद्यकीय तपासणी परिपत्रक खालील प्रमाणे काढण्यात यावे.

| | | |
|---|---|---|
| १ | डॉक्टर | प्रती विद्यार्थी रु १५/- प्रमाणे, मात्र दिवसाला किमान रु. २०००/ अधिक प्रती सत्र रु ३००/- प्रमाणे वाहन भत्ता अनुज्ञेय राहील |
| २ | आंतर्गत सहाय्यक - एक शारीरिक शिक्षण शिक्षक | प्रती विद्यार्थी रु ५/- प्रमाणे, मात्र दिवसाला किमान रु. ५००/ |
| ३ | कारकून | सहाय्यक प्रती सत्र प्रती व्यक्ती रुपये २००/- प्रमाणे |
| ४ | तपासणी अर्ज विद्यापीठाचा | रु.५/- प्रमाणे |

वरील मानधनावर होणारा खर्च महाविद्यालातर्फे विद्यार्थ्यांकडून घेण्यात येणाऱ्या वैद्यकीय तपासणी शुल्कातून करण्यात येईल व विद्यापीठावर याचा कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही.

आपला स्नेही

सचिव, नुपेटा